# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

-----------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०९ जुलै, २०२६ / आषाढ १८, १९४८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | महसूल मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | वने मंत्री | |
| (३) | आदिवासी विकास मंत्री | |
| (४) | कृषी मंत्री | |
| (५) | सामाजिक न्याय मंत्री | |
| (६) | रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री | |
| (७) | मदत व पुनर्वसन मंत्री | |
| (८) | मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री | |

---------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २४**

---------------------------------------

### नाशिक जिल्ह्यात रिंग रोडच्या जमीन मोजणीवेळी प्रांताधिकारी यांनी शेतकरी महिलांना मारहाण केल्याबाबत

**(१) * ३२६६५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात रिंग रोडच्या जमीन मोजणीवेळी प्रांताधिकारी यांनी मुंगसरे गावातील शेतकरी महिलांना घरात घुसून दिनांक ७ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान अमानुषपणे मारहाण केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणानंतर जिल्हाधिकारी नाशिक यांनी प्रांताधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नोटीशीच्या अनुषंगाने प्रांताधिकारी यांनी आपला खुलासा जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला आहे काय व खुलाश्यात पीडित महिलेला मारहाण करण्याचे कोणते कारण दिले आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी पुराव्यानिशी तक्रार लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४) व (५) नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजनास्तव बाह्य रिंगरोडसाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. त्यानुषंगाने मातोरी व मुंगसरे या गावातील भूसंपादनास बाधीत शेतकऱ्यांचा विरोध आहे. सदर संपादनाच्या कार्यवाहीमध्ये दिनांक २ मे, २०२६ रोजी सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक मोजणीसाठी गेले असता, काही शेतकरी आत्मदहनाच्या प्रयत्नात असल्याचे निदर्शनास आल्याने अनर्थ टाळण्यासाठी महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या

मदतीने कार्यवाही करण्यात आली. तथापि, मारहाण झाल्याची वस्तुस्थिती निदर्शनास आली नाही. तसेच संबंधित सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांनी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे दिनांक ७ मे, २०२६ रोजी खुलासा सादर केलेला असून खुलाशात त्यांनी सदर महिलेला मारहाण केल्याचे नाकारले आहे.

-----------------

## राज्यातील वृक्षलागवडीची अंमलबजावणी सुनिश्चित करण्याबाबत

**(२) * ३६३०३ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने वृक्षतोडीची परवानगी मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या संख्येत मोठी कपात करून ही प्रक्रिया अधिक सुलभ केल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाने जारी केलेल्या सुधारित परिपत्रकानुसार पूर्वी अनिवार्य असलेल्या ११ कागदपत्रांऐवजी आता केवळ ५ कागदपत्रे आवश्यक असून परवानगी देण्याचा कालावधी ३० दिवसांवरून १५ दिवसांवर आणण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'ईझ ऑफ डुईंग बिझनेस' अंतर्गत घेतलेल्या या निर्णयामुळे वृक्षतोडीचे प्रस्ताव जलद गतीने निकाली काढले जाणार असले तरी राज्यातील जुन्या वृक्षसंपदेवर आणि पर्यावरणावर होणाऱ्या संभाव्य दुष्परिणामांचा तांत्रिक अभ्यास शासनाने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात ३०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट आखले जात असताना वृक्षतोड सुलभ केल्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडू नये यासाठी तोडल्या जाणाऱ्या वृक्षांच्या बदल्यात नवीन वृक्ष लावण्याच्या 'हमीपत्राची' प्रत्यक्ष अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी शासनाने कोणती सनियंत्रण यंत्रणा कार्यान्वित केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे आहे.

(२) शासन परिपत्रक दिनांक २७ एप्रिल, २०१७ अन्वये वृक्षतोडीसाठी ११ कागदपत्रांची आवश्यकता होती. ती आता शासन शुध्दीपत्रक दिनांक २९ एप्रिल,२०२६ अन्वये ११ कागदपत्रावरुन ५ करण्यात आलेली आहे. तसेच शासकीय व औद्योगिक प्रकल्पांना वृक्षतोडीसाठी परवानगी देण्याचा कालावधी हा १५ दिवस करण्यात आलेला आहे.

(३) वृक्षतोड परवानगी प्रक्रियेचे डिजीटलायझेशन आणि सुलभीकरण करत असताना पर्यावरणाचा समतोल राखणे आणि राज्यातील जुन्या व दुर्मिळ वृक्षसंपदेचे जतन व संवर्धन करणे या बाबींना सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून, सर्व कायदेशीर व तांत्रिक निकषांचे काटेकोरपणे पालन करण्यात येत आहे.

(४) महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ मधील कलम ३(१) (ख) अन्वये तोडलेल्या झाडांच्या बदल्यात नविन झाडे लावण्याबाबतची कायदेशीर तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच कलम ३ (३) अन्वये सदरची वृक्ष लागवड न केल्यास मालकाकडून किंवा भोगवटदाराकडून लागवडीच्या खर्चाची वसूली करण्याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी तथा वृक्ष अधिकारी हे आदेश करु शकतात. सदरच्या कायदेशीर तरतुदीनुसार मालकीधारक/ भोगवटदार यांच्याकडून हमीपत्र घेण्यात येत आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर येथे विद्यार्थ्यांनी अनुसूचित जमातीचे बनावट प्रमाणपत्र सादर करुन प्रवेश घेतल्याबाबत**

**(३)** * **३९५६५ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील ३२ विद्यार्थ्यांनी अनुसूचित जमातीचे बनावट प्रमाणपत्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (एमएचसीईटी) सेलकडे सादर करुन प्रवेश घेतल्याचे दिनांक ३० मार्च, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारे अनुसूचित जमातीचे बनावट प्रमाणपत्र प्राप्त केल्याने मुळ अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित रहावे लागल्याने त्यांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके :** (१), (२) व (३) अनुसूचित जमातीच्या आरक्षित जागेचा लाभ घेण्याकरीता ३२ विद्यार्थ्यांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याचे आढळून आले आहे.

त्याअनुषंगाने आयुक्त, संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (MH-CET), मुंबई यांना सदर उमेदवार/विद्यार्थी यांचेवर अधिनियम २००० मधील कलम १०,११ व १२ नुसार लाभ काढून घेणे तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८, ३३५, ३३६, ३३७, ३३९ व ३४० नुसार गुन्हा दाखल करण्याबाबत कळविण्यात आले.

ज्या उमेदवारांनी बनावट वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यांचे व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश प्रक्रियेदरम्यान रद्द करण्यात आले असल्याचे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (MH-CET) यांनी कळविले आहे. बनावट वैधता प्रमाणपत्र तयार करण्याप्रकरणी दोन सहाय्यक प्राध्यापकांसह एकूण ११ जणाविरुध्द पाचगांव पोलीस ठाणे, नागपूर (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल (FIR) करण्यात आलाआहे. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शिक्षण संस्थेने अनुसूचित जमाती प्रमाणपत्राच्या वैधता प्रमाणपत्राशिवाय अर्जदारांना अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश देऊ नये व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई उपनगरातील खारफुटी क्षेत्रात बेकायदेशीररित्या उभारण्यात आलेल्या वस्त्या निष्कासित करण्याबाबत**

**(४)** * **४१०९५ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील विक्रोळी येथील कन्नमवारनगर परिसरात कोरोना काळापासून म्हणजेच दिनांक ९ मार्च २०२० रोजी पासून खारफुटीची कत्तल करून चार ते पाच एकर क्षेत्रावर भराव टाकून वस्ती उभी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडाळा मिठागराच्या खारफुटी क्षेत्राजवळ आणि पूर्व द्रुतगती मार्गाच्या परिसरात तसेच भांडूप-कांजूरमार्ग दरम्यानही मोठ्या प्रमाणावर भराव टाकून वस्त्या उभारण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विक्रोळीतील कन्नमवारनगर हा भाग ठाणे खाडीच्या रोहित पक्षी अभयारण्य क्षेत्रामध्ये येत असून सन २०२० आणि सन २०२३ मध्येही खारफुटीवर भराव टाकून वस्त्या उभारण्यात येत असल्याच्या स्थानिक

नागरिकांनी सातत्याने तक्रारी केल्या असून तत्कालीन मुख्यमंत्री यांना या परिसरातील छायाचित्रे, गुगल अर्थचा संदर्भ असलेले नकाशे आणि व्हिडीओही पाठविले असूनही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही न झाल्याने तेथे वस्ती वाढलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर खारफुटी क्षेत्रावर भराव टाकून केलेल्या वस्त्यांच्या बांधकामामुळे भरती-ओहोटी क्षेत्रात अडथळा निर्माण झाला असून या प्रकरणी नागरिकांनी कांदळवन कक्षाकडे वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून सदर वस्त्यांच्या बांधकामाकडे दुर्लक्ष केल्यामुळे सन २०१९ च्या सीआर कायदा पाणथळ जागा कायदा २०१० आणि सन १९७२ च्या वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मुंबई उपनगरातील खारफुटी क्षेत्रात बेकायदेशीररित्या उभारण्यात आलेल्या वस्त्या निष्कासित करून कांदळवन क्षेत्र राखण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे हरियाली कन्नमवार नगर येथील कांदळवन विभागाच्या ताब्यातील न.भू.क्र. ३६३ च्या क्षेत्रात सन २००५ पूर्वी पासून जुन्या अतिक्रमीत झोपड्या असून सदर अतिक्रमणाबाबत दिनांक २७ ऑगस्ट,२०१८ रोजी वनगुन्हा नोंदवण्यात आलेला आहे.

तथापि, कांदळवन विभागाच्या ताब्यात असलेल्या वडाळा मिठागराच्या खारफुटी क्षेत्राजवळ आणि पूर्व द्रुतगती मार्गाच्या परिसरात तसेच भांडूप-कांजूरमार्ग दरम्यान कांदळवन विभाग उत्तर कोकण यांचे अखत्यारित असलेल्या क्षेत्रात भराव टाकून वस्त्या उभारण्यात आल्याचे दिसून येत नाही.

मॅन्ग्रुव सुरक्षा ॲपवर प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी केली असता, महसूल विभागाच्या ताब्यातील न.भू.क्र. ३६२ व ३६४ क्षेत्रावर पक्क्या स्वरूपाचे बांधकाम, कच्च्या खोल्यांचे बांधकाम तसेच माती व डेब्रीजचा भराव करून हिरवी नेट लावून अतिक्रमण केल्याचे दिसून येते.

त्यानुषंगाने वनक्षेत्रपाल, ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य, ऐरोली यांनी दिनांक ७ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर व दिनांक २ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६अंतर्गत कारवाई करण्याबाबत कळविले होते. यापूर्वी मॅन्ग्रुव सुरक्षा ॲपवर प्राप्त अन्य तक्रारींच्या अनुषंगाने पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत विक्रोळी पोलीस ठाणे येथे दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी गुन्हा नोंदवण्यात आलेला आहे.

प्रश्नांकित खारफुटी क्षेत्रावर भराव टाकून केलेल्या वस्त्यांच्या बांधकामामुळे भरती- ओहोटी क्षेत्रात अडथळा निर्माण झाला असून या प्रकरणी नागरिकांनी कांदळवन कक्षाकडे वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष करण्यात आलेले असल्याबाबतची बाब ही खरी नसून कांदळवन विभागाकडून प्राप्त तक्रारीबाबत वेळीच दखल घेऊन संबंधित विभागाला सदर ठिकाणी पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अन्वये कारवाई करण्याकरिता अवगत करण्यात येते.

**उपाययोजना**

१) अधिनस्त अधिकारी / क्षेत्रीय कर्मचारी यांच्याकडून नियमित गस्त करण्यात येते.

२) कांदळवन क्षेत्रात नवीन अतिक्रमण होऊ नये यासाठी महाराष्ट्र सुरक्षा रक्षक जवान यांची चौकी स्थापन करून त्यांच्याद्वारे गस्त करण्यात येते.

३) मुंबईतील विक्रोळी येथील मौजे हरियाली कन्नमवार नगर मधील कांदळवन संरक्षणाकरिता ५११ मी. लांबीचे संरक्षक भिंतीचे काम करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्याच्या शहरी भागात वास्तव्यास असलेल्या शेतकऱ्यांना**
**'महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी' योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(५) * ३७५०२ श्री.सुमित वानखेडे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना व मजुरांना शेततळे, विहिरी, कच्चे रस्ते आदी सुविधा मिळत असताना शहरी भागातील शेतकरी व मजुरांना केवळ तांत्रिक निकषांमुळे या योजनेचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रातील रहिवासी असलेल्या व ज्यांची शेती ग्रामीण भागात आहे, अशा शेतकऱ्यांचे जॉब कार्ड ग्रामपंचायत कार्यालयातून देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लातूरसह राज्यातील इतर शहरांच्या विस्तारित हद्दीत (मनपा व नगरपालिका क्षेत्र) मोठ्या प्रमाणावर कृषी क्षेत्र व शेतकरी वर्ग असूनही ही योजना नागरी भागासाठी लागू नसल्याने हजारो शेतकरी शासकीय लाभांपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरी भागातील शेतकऱ्यांची होणारी आर्थिक कोंडी दूर करण्यासाठी व नागरी भागातही मुलभुत सुविधा उभारणीसाठी ही योजना नागरी क्षेत्रातही लागू करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नागरी भागात वास्तव्यास व ग्रामीण भागात शेती असलेल्या शेतकऱ्यांना 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी' योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ अन्वये देशभरातील केवळ ग्रामीण क्षेत्रातील कुटुंबांना १०० दिवसांची अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देण्यात आली असून नागरी क्षेत्रांमध्ये योजनेची अंमलबजावणी करण्याची तरतूद नाही.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना नागरी भागासाठी लागू नाही. तसेच, 'क' वर्ग नगरपरिषद/ नगरपंचायती अंतर्गत राज्य रोजगार हमी योजना लागू असून संबंधीत 'क' वर्ग नगरपरिषद / नगरपंचायत यांनी संबंधीतांना जॉब कार्ड देणे आवश्यक आहे.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मधील कलम १२-ड नुसार राज्यातील 'क' वर्ग नगरपरिषद / नगरपंचायतींमध्ये राज्य रोजगार हमी योजना लागू आहे.

(४) हे खरे नाही.

नियोजन विभाग, रोहयो प्रभागाच्या दिनांक ३ मार्च, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील 'क' वर्ग नगरपरिषद/नगरपंचायत या नागरी भागात रोजगार हमी योजना लागू करण्याचे धोरण विहित करण्यात आले आहे. त्यानुसार कुटुंबांना मागणीनुसार काम देण्याबाबत देखील तरतुद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शेतीच्या उत्पादन खर्चाच्या अनुषंगाने पिकांना हमीभाव देण्याबाबत

**(६) * ३३३१० डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तीन शेतकऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून पिकांचा हमीभाव (एमएसपी) ठरवताना शेतीचा प्रत्यक्ष उत्पादन खर्च, जमिनीचे भाडे आणि भांडवलावरील खर्च विचारात घेण्याची मागणी केल्यानुसार न्यायालयाने केंद्र शासनाला नोटीस बजावली असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासन हमीभाव ठरवताना केवळ प्रत्यक्ष खर्च आणि कुटुंबाचे श्रम विचारात घेते, तथापि शासनाने सुचवलेला खर्च आणि शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष लागवड खर्च याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून हमीभाव खरेदी प्रक्रिया केवळ गहू आणि तांदळापुरती मर्यादित न ठेवता ती सोयाबीन, कापूस यांसारख्या इतर पिकांसाठी लागू करून शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या १००% भरपाई मिळावी यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे कोणता पाठपुरावा केला आहे तसेच हमीभावाच्या त्रुटींमुळे वाढणाऱ्या शेतकऱ्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) श्री. प्रकाश गोपाळराव पोहरे विरुद्ध युनियनऑफ इंडिया आणि इतर या शीर्षकाची रिट याचिका क्रमांक ३८४/२०२६ सध्या मा. सर्वोच्च न्यायालयासमोर प्रलंबित आहे. या रिट याचिकेत, इतर मुद्द्यांबरोबरच, उत्पादन खर्चाची गणना आणि किमान आधारभूत किंमत रचनेशी संबंधित इतर विविध मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. सदर प्रकरण सध्या मा.सर्वोच्च न्यायालयासमोर न्यायप्रविष्ट आहे.

(२) केंद्र शासन हमीभाव ठरवताना खेळते भांडवल, खेळत्या भांडवलाचे व्याज (६%), भाडेतत्त्वावर भाडे, कौटुंबिक श्रम इ. पध्दतीने उत्पादन खर्चाची परिगणना करते. त्यात प्रत्यक्ष खर्च, कुटुंबाचे श्रम आणि त्याआधारे शेतकऱ्यांचा येणारा प्रत्यक्ष लागवड खर्च गृहीत धरण्यात येतो.

राज्य शासनाने शिफारस केलेल्या किंमती विचारात घेताना केंद्र शासन अन्य राज्य व केंद्रशासित प्रदेशाकडून आलेल्या किंमती देखील विचारात घेते. सोबतच केंद्र शासन स्वत:त्यांच्या यंत्रणेकडूनही उत्पादन खर्चाची माहिती संकलित करते. त्याआधारे उत्पादन खर्चाची परिगणना करते.

(३) किमान आधारभुत योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हंगाम २०२५-२६ मध्ये राज्यात कडधान्य व तेलबियांची खरेदी प्रक्रिया सहकार व पणन विभागाकडून राबविण्यात आली असुन त्यामध्ये सोयाबीन, उडिद, तुर हरभरा इत्यादींचा समावेश आहे.

राज्यातील जास्तीत जास्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सी.सी.आय. ने कापूस हंगाम सन २०२५-२६मध्ये १६८ खरेदी केंद्रे सुरू केली आहेत.

नाफेड व एनसीसीएफ यांच्या मार्फत खरेदी करण्यात येणाऱ्या कडधान्य खरेदीवर राज्य शासनामार्फत आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सुट देण्यात आली असुन खरेदी प्रक्रीयेदरम्यान अनियमितता किंवा गैरव्यवस्थापन टाळण्याच्या दृष्टीने दक्षता पथक शासन निर्णय, दिनांक २५ ऑक्टोबर, २०२५ अन्वये स्थापन करण्यात आले आहे.

तसेच प्रधान सचिव (पणन) यांचे अध्यक्षतेखाली दर सोमवारी हमीभाव योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या शेतमालासंदर्भात आढावा बैठक घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शहादा (जि.नंदुरबार) येथील गोदामात विनापरवाना नियमबाह्यरित्या खत साठविल्याबाबत**

**(७) * ३४८१० श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहादा (जि.नंदुरबार) येथील गोदामात विनापरवाना खत साठविल्याबाबत शहादा तालुका कृषी विभागाच्या पथकाने धाड टाकून रुपये ६१ हजार १३० किंमतीचा खत साठा जप्त केल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विनापरवाना खत साठविणाऱ्यावर कारवाई करण्यासह राज्यात शेतकऱ्यांना योग्य पध्दतीने खत पुरवठा करून खताची साठवणूक करणाऱ्यांना रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे आहे.

(२) शहादा (जि.नंदुरबार) येथील गोडाऊनमध्ये विना परवाना खत साठविणे व विक्री करणे या प्रकरणी संबंधित व्यक्ती व त्यांना खत पुरवठा करण्याच्या गुजरात राज्यातील मयंक कृषी सेवा केंद्र चिनोदा, (ता.निझर जि.तापी) यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन शहादा, (जि.नंदुरबार) येथे खत नियंत्रण आदेश, १९८५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील कारवाई पोलीसांमार्फत सुरु आहे. याप्रकरणी महाधन कंपनीच्या खत नमूना अप्रमाणित आढळून आला असून त्याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे. नंदूरबार जिल्ह्यात जिल्हास्तरावर १ व तालुकास्तरावर ७ भरारीपथके स्थापन केली आहेत. तसेच जिल्ह्यात गुण नियंत्रण निरीक्षकांमार्फत नियमितपणे कृषि निविष्ठांची तपासणी करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डोंगरगाव घुटी (जि.नागपूर) येथील खाजगी संस्थेस शैक्षणिक प्रयोजनासाठी भाडेकराराने दिलेल्या जमिनीची विक्री केल्याबाबत**

**(८) * ४०७३१ श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरगाव घुटी (जि.नागपूर) येथील सर्वे क्रमांक २६ प.ह. ७३ खाते १०० येथील शासकीय जमिनीपैकी २५ एकर जमीन शैक्षणिक प्रयोजनासाठी संस्थेस सन २००८ मध्ये भाडेकराराने (लीजवर) प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन कोणतेही हस्तांतरण/विक्री/तारण/गहाण करण्यास व अभियांत्रिकी महाविद्यालयाशिवाय अन्य प्रयोजनाच्या वापरास प्रतिबंधित या अटी शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक प्रयोजनासाठी सेमाना विद्या व वन विकास प्रशिक्षण मंडळ या संस्थेस भाडयाने जमीन दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४ मध्ये सेमाना विद्या व वन विकास प्रशिक्षण मंडळ या संस्थेने सदर संस्थेने तांत्रिक शिक्षण प्राधिकरण ए.आय.सी.टी.इ. ने शासनाची कोणतीही रीतसर परवानगी न घेता गायकवाड शिक्षण संस्थेस बेकायदेशीररित्या विक्री केली असल्याची महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान तक्रार प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत महसूल मंत्री यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीवर जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून तातडीने अहवाल मागविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह उक्त हस्तांतरण रद्द करून शासकीय जमीन पूर्ववत शासनास जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अशत: खरे आहे.

सेमाना विद्या व वन विकास प्रशिक्षण मंडळ या संस्थेस शासनाने अभियांत्रिकी महाविद्यालय व इतर शैक्षणिक प्रयोजनासाठी प्रश्नाकिंत जमीन कब्जेहक्काने प्रदान केली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली असून त्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करुन सदर प्रकरणी शर्तभंग आढळल्यास त्याबाबत अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी, नागपूर (ग्रामीण) यांना कळविण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी, नागपूर (ग्रामीण) यांचा अहवाल प्राप्त होताच सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतील मोका तपासणी अहवाल व जिओ-टॅगिंग प्रक्रियेत झालेली अनियमितता**

**(९) * ३९४१६ श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतंर्गत (सूक्ष्म सिंचन) अंतर्गत शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचन संच बसविण्यासाठी अनुदान मंजुरीपूर्वी “मोका तपासणी अहवाल” बंधनकारक करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही कृषी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतात न जाता घरबसल्या खोटे मोका तपासणी अहवाल सादर करून जिओ-टॅगिंगद्वारे चूकीचे भौगोलिक स्थानांकन करून तपासणी दाखविल्याची तक्रार कृषी आयुक्तालयाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ठिबक सिंचन संचांच्या साहित्य खरेदीत व प्रत्यक्ष शेतात बसविलेल्या सामग्रीत तफावत असून काही ठिकाणी बनावट किंवा चुकीच्या कंपनीच्या देयकाच्या आधारे अनुदान मंजूर केल्याने राज्यभर तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यात प्रधानमंत्री कृषी सिंचन (सूक्ष्म सिंचन) योजनेतील मोका तपासणी अहवाल व जिओ-टॅगिंग प्रक्रियेत पारदर्शकता वाढविणे तसेच अनुदान वितरणातील त्रुटी दूर करून भविष्यात अशा प्रकारच्या अनियमितता रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) हे अंशतः खरे आहे.

मंडळ कृषी अधिकारी बेल्हे, तालुका कृषी अधिकारी जुन्नर, जिल्हा पुणे कार्यक्षेत्रामध्ये सूक्ष्म सिंचन योजनेमध्ये झालेल्या अनियमितता/अपहार प्रकरणी तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय कृषी अधिकारी, राजगुरुनगर यांच्या अध्यक्षतेखाली तपासणी पथके नेमून मंडळ कृषी अधिकारी, बेल्हे कार्यक्षेत्रातील सन २०२५-२६ मधील सूक्ष्म सिंचन बसवून मोका तपासणी पूर्ण झालेल्या ४६१ संचाची / प्रस्तावाची तपासणी करून अहवाल कृषि आयुक्तालयास सादर केला होता. त्यानुसार अनियमितता / अपहाराच्या अनुषंगाने विभागीय कृषि सहसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ च्या आदेशान्वये उप कृषि अधिकारी बेल्हे-१ व उप कृषि अधिकारी बेल्हे-२ यांना निलंबित केले आहे. तसेच, तालुका कृषि अधिकारी, जुन्नर यांच्या विरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची बाब शासनस्तरावर कार्यन्वित आहे.
(४) कृषि आयुक्तालयाच्या दिनांक १६ एप्रिल, २०२६ रोजीच्या पत्रानुसार प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना-प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन योजना) योजनेअंतर्गत अनियमितता आढळून आल्यास आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत विभागीय कृषी सहसंचालक (सर्व) व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (सर्व) यांना कळविण्यात आले आहे. तसेच मोका तपासणी करते वेळेस जिओ-टॅगिंग करण्यात येते. यामध्ये स्थळपाहणीचा अक्षांश रेखांश असलेला फोटो महाडीबीटी पोर्टलवर अपलोड करण्यात येतो. अधिक पारदर्शक प्रक्रियेसाठी नव्याने विकसित होणाऱ्या महाडीबीटी २.० प्रणालीमध्ये मोका तपासणी, अनुदान परिगणना आणि उत्पादक व वितरक यांचा साठा पडताळणी व्यवस्थापन (स्टॉक मॅनेजमेंट) या बाबी अंतर्भूत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कल्याण ग्रामीण (जि.ठाणे) क्षेत्रातील २७ गावांमधील दस्तऐवज नोंदणी प्रक्रिया बंद असल्याबाबत**

**(१०) * ३९४९० श्री.राजेश मोरे (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांमध्ये जुन्या नोंदणीकृत सदनिकांच्या पुनर्विक्री व्यवहारांसाठी दस्तऐवज नोंदणी प्रक्रिया बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागात जुन्या सदनिकांचे व्यवहार थांबल्यामुळे नागरिकांना मालमत्ता खरेदी-विक्रीमध्ये अडचणी निर्माण होत असून त्याचा शासनाच्या महसुली उत्पन्नावर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांमध्ये दस्तऐवज नोंदणी प्रक्रिया बंद ठेवण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने नागरिकांच्या अडचणी दूर करण्यासाठी तसेच शासनाचा महसूल वाढविण्यासाठी सदर दस्तऐवज नोंदणी प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत असल्यास ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मणदूर (ता.शिराळा, जि.सांगली) येथील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांबाबत**

**(११) * ४०२६९ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मणदूर (ता.शिराळा, जि.सांगली) येथे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामुळे बाधित प्रकल्पग्रस्तांचे विविध मागण्या संदर्भात सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुमारे ८० दिवसांपासून सुरू असल्याचे दिनांक ०९ मार्च, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३२४ खातेदारांची जमीन संपादित झाली आहे त्यापैकी २१२ खातेदार हे पूर्णपणे भूमिहीन झाले आहेत तर ८९ खातेदारांची १ एकर पेक्षा कमी जमीन शिल्लक असून ११ खातेदारांना १ एकरपेक्षा जास्त क्षेत्र शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांचे १९७६ च्या पुनर्वसन अधिनियमान्वये पुनर्वसन मूळ जागेवर करण्यासाठी वारंवार आंदोलने करण्यात आली असून शासनास निवेदने देवून वेळोवेळी त्यांच्यासोबत बैठका घेण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पाटबंधारे विभागाच्या ताब्यातील शिल्लक जमीन ही मूळ प्रकल्पग्रस्तांना देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गणेश नाईक :** (१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी कळविल्यानुसार मणदूर (ता.शिराळा,जि.सांगली) येथे दिनांक ९ मार्च, २०२६ रोजी सह्याद्री व्याघ्र प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन झाले होते. हे खरे आहे. मात्र, हे आंदोलन मानव-वन्यजीव संघर्ष अंतर्गत नुकसान भरपाई व तत्सम मागण्याबातचे असून, पुनर्वसनाशी संबंधित नव्हते.

दिनांक ९ मार्च,२०२६ रोजी झालेले आंदोलन विचारात घेऊन दिनांक २४ एप्रिल,२०२६ रोजी क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर यांची संबंधित आंदोलक यांचेसमवेत बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत आंदोलनाशी संबंधित खालील मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

- वनामध्ये फळझाडांची लागवड करणे व पाणवठे व्यवस्थापन करणे, त्या अनुषंगाने समितीचे गठन करणे व प्रत्यक्ष जंगलात बैठकीचे आयोजन करणे.
- शेतकऱ्यांना उपद्रव करणाऱ्या वन्यप्राण्यांना ठार मारणेबाबत.
- नुकसान भरपाई प्रकरणी सरसकट अर्थसहाय्य मिळणे, तसेच मका पिकास संरक्षण मिळणेबाबत.
- इतरत्र ठिकाणाहुन माकड, वानर, कुत्री, इ. प्राणी मणदुर व जंगल परिसरात सोडू देऊ नयेत.
- मानव-वन्यजीव संघर्ष प्रकरणी तात्काळ व कायमस्वरुपी मदत मिळणेबाबत तसेच मोबाईल ॲम्ब्युलन्स उपलब्ध होणेबाबत.
- गावांतील निवडक युवकांचे जलद प्रतिसाद पथक तयार करणे व त्यांना प्रशिक्षण देणे.
- वनपरिक्षेत्र परिसरातील डंग/देवराई यात्रेकरिता आवश्यक सहकार्य करणे.
- मौजे-उखळू येथे रस्त्यालगत सौर दिवे बसविणे.
- चांदोली वनपरिक्षेत्र कार्यालय परिसरातील पोटकालव्यावर झाकन टाकणे.

(२), (३) व (४) सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील बाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाच्या अनुषंगाने शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिका क्षेत्रातील मौजे डुडूळगाव येथे इको टुरिझम पार्कचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(१२)** * **४०९०२ श्री.समीर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिका क्षेत्रातील मौजे डुडूळगाव येथील वन विभागाच्या राखीव वनक्षेत्रात प्रस्तावित "इको टुरिझम पार्क' (वन उद्यान व निसर्ग पर्यटन स्थळ) प्रकल्पाबाबत शासनास पाठविलेला प्रस्ताव निधी अभावी नामंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी आवश्यक निधीची तरतूद राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली नसल्यामुळे प्रकल्पाची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधीअभावी प्रकल्प प्रलंबित असल्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना उपलब्ध होऊ शकणाऱ्या पर्यावरणपूरक पर्यटन, मनोरंजन व सार्वजनिक सुविधांमध्ये विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर प्रकल्पासाठी आवश्यक निधीची तात्काळ तरतूद करून कामास गती देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. गणेश नाईक :** (१), (२), (३) व (४) पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील मौजे डुडूळगाव येथील वन विभागाच्या राखीव वनक्षेत्रात प्रस्तावित "इको टुरिझम पार्क (वन उद्यान व निसर्ग पर्यटन स्थळ) प्रकल्प विकसित करणेकरीता वनउद्यानामध्ये करण्यात येणाऱ्या कामांचे आराखड्यास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी मान्यता प्रदान केली आहे. सदर मंजूर आराखडयानुसार निधी मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येत असून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर निधीची उपलब्धता विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येईल. दरम्यान सदर प्रस्तावास व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी सन २०२६-२७करीता आराखड्याच्या मुदतवाढीस मंजूरी देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मांडवा (ता.वाडा, जि.पालघर) येथे विनापरवाना अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(१३)** * **४१३७८ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मांडवा बालशेतपाडा (ता. वाडा, जि. पालघर) येथे सर्व्हे क्रमांक ६५/१ व ६५/२ पैकी, १,२,३,४, ३५ सेक्शन जागेमध्ये तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत, वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग इत्यादी कार्यालयांकडून शासनाच्या कुठल्याही परवानग्या न घेता मोठ्या प्रमाणात वृक्षतोड व मातीचे उत्खनन करुन अनधिकृत बांधकाम तेथील महसूल अधिकारी व वन अधिकारी यांच्या संगनमताने सुरु असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींकडून पालघर जिल्हाधिकारी यांना लेखी पत्राव्दारे करण्यात आली आहे, हे खरे आहे, काय,
(२) असल्यास, सदरील सर्व्हे क्रमांकामध्ये मध्ये झालेल्या अनधिकृत ३५ सेक्शन जमिनीमध्ये केलेल्या अनधिकृत कामांची शासनाने उच्चस्तरीय सखोल चौकशी करून संबंधित विकासकांवर कारवाई करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) मा.विधानसभा लोकप्रतिनिधी (शहापुर) यांनी दिनांक १६/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मौजे-मांडवा (बालशेतपाडा) येथील जागेमध्ये शासनाची कोणत्याही प्रकारे परवानगी नसतांना वृक्षतोड, मातीचे उत्खनन व बांधकाम या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर कार्यालयाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तसेच उप वनसंरक्षक जव्हार वन विभाग, जव्हार यांनी केलेल्या चौकशीमध्ये मौजे-मांडवा, ता. वाडा येथील ग.नं. ५/१, ६५/२, ६५/३, ६५/४ एकूण क्षेत्र २२.१२.० हे. आर ही जमीन श्री. अभि तेजस शाहा व इतर ८ यांचे नावे असून सदर क्षेत्रापैकी

२१.४० हे.आर. क्षेत्रास भारतीय वन अधिनियम १९२७, कलम ३५ अन्वये नोटीस क्रमांक ९२१, दिनांक १७/०३/१९५८ अन्वये लागू असलेबाबतची नोंद आढळून आलेली आहे. सदर जमिनीमध्ये नैसर्गिक नाल्याचा प्रवाह सुरळीतपणे होऊन जमिनीची धूप होऊ नये या करीता मोरीचे जवळ थोड्या प्रमाणात सपाटीकरण केलेले असून सर्व जमीन माळरान आहे व सदरहू जमिनीमध्ये आंबा लागवड करण्यासाठी अंदाजे २५० खड्डे खोदलेले असून कोणत्याही प्रकारे मातीचे उत्खनन केलेले नाही किंवा मातीची इतरत्र वाहतूक केल्याचे आढळून आलेले नाही.

तसेच मा. विधानसभा लोकप्रतिनिधींच्या उक्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने तहसीलदार वाडा व उपविभागीय अधिकारी वाडा यांनी सदरहू ठिकाणाची दिनांक १९/०१/२०२६ रोजी पाहणी केली असता बांधकाम अथवा गौणखनिज उत्खनन व वृक्षतोड केल्याचे आढळून आलेले नाही.

-----------------

### मराठवाडयाच्या सिमावर्ती भागातून बनावट बियाण्यांची विक्री होत असल्याबाबत

**(१४) * ३३०७४ श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयासह मराठवाडयात तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यांच्या सिमावर्ती भागातून बनावट व दर्जेदार कंपन्यांची खोटी लेबल लावून बियाण्यांची विक्री होत असल्याने जवळपास ४०-५०% बियाण्यांचे नमुने अपात्र ठरले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट बियाणे विक्री करणाऱ्याविरूध्द पाच वर्ष कारावास व एक लक्ष रुपयाच्या दंडाची तरतूद असतांनाही किरकोळ कारवाई करून दोषींना पाठीशी घातल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या व त्याच्या कुटूंबियांच्या उदरनिर्वाहाची बाब असल्याने मराठवाडयातील बनावट बियाणे विक्री करणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यावर तसेच विक्रेत्याविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) व (२) हे खरे नाही. परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यात तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यांच्या सीमावर्ती भागामधून बनावट व दर्जेदार कंपन्यांची खोटे लेबल लावून बियाण्याची विक्री होत असल्याचे आढळून आले नाही. गुणनियंत्रण तपासणीदरम्यान मराठवाड्यात तपासणीअंती १३७ बियाणे नमुने अपात्र आढळून आले आहेत.

(३) लातूर विभागामध्ये तपासणीसाठी पाठविलेल्या बियाण्यांच्या २९३४ नमुन्यांपैकी ७४ नमुने अप्रमाणित घोषित केले आहेत. लातूर विभागातील नांदेड, हिंगोली या जिल्हयांमध्ये विनापरवाना बियाणे विक्री बाबत प्रत्येकी एक गुन्हा दाखल केला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात बीड जिल्हयातील आष्टी तालुक्यात एका उत्पादकाच्या नावे उडीद पीकाचे वाण एन.यु.एल.-७ (विश्वास) याचे नक्कल पॅकेट असणारे हे बनावट बियाण्याची विक्री करणाऱ्या निविष्ठा विक्रेत्यावर गुन्हा नोंद केला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड या तीन जिल्ह्यांमध्ये तीन बियाणे विक्रेत्यांचे परवाने निलंबित व आठ बियाणे विक्रेत्यांचे परवाने रद्द केले आहेत. राज्यात खरीप हंगाम सन २०२६-२०२७ मध्ये अनाधिकृत एच.टी.बी.टी. बियाण्याच्या अनुषंगाने एकूण ३६ पोलीस गुन्हे दाखल केले १९,५८२ पाकीटे जप्त केली असून २०१३ किलोग्रॅम खुले बियाणे जप्त केले आहे. त्याचे मुल्य रु. २ कोटी २९ लक्ष इतके आहे. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात बियाण्यांची तपासणी, नमुना संकलन व उत्पादक विक्रेत्यांची तपासणी नियमितपणे करण्यात येत आहे. संबंधित विक्रेते/वितरक/उत्पादक यांचे विरूद्ध अत्यावश्यक वस्तु अधिनियम,१९५५, बियाणे अधिनियम, १९६६, बियाणे नियम, १९६८ अन्वये नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना शहरातील सर्व्हे क्र. ५५४ मधील ५ एकर जमीन बनावट कागदपत्रांच्या आधारे बळकाविल्याबाबत

**(१५) * ३७१५४ श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना शहरातील सर्व्हे क्र. ५५४ मधील ५ एकर जमीन बनावट कागदपत्रांच्या आधारे बळकावण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात तत्कालीन भूमी अभिलेख अधिकारी व दुय्यम निबंधकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित जमिनीच्या नोंदींमध्ये कोणतीही नोटीस न देता फेरफार करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मूळ शासकीय अभिलेख्यातून नस्ती गहाळ झाली असल्याचे न्यायालयीन पडताळणीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बनावट कागदपत्रांच्या आधारे विक्री करारनामे नोंदवून जमीन व्यवहार करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह महसूल व नोंदणी विभागातील जमीन गैरव्यवहारावर नियंत्रण ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

जालना शहरातील सर्व्हे क्र. ५५४ मध्ये जिल्हाधिकारी, जालना यांचेकडील अकृषक आदेश, तसेच मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांचेकडील मंजूर अभिन्यास (लेआउट) अन्वये सुरजाबाई कचरुलाल आबड यांच्या नावे मिळकत पत्रिका उघडण्यात आली आहे. त्यातील ६६ भूखंड सुरजाबाई यांनी त्यांची मुलगी संध्या राजेंद्र डागा यांना दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर जालना यांचे विशेष दिवाणी दावा क्र. २७/२००७ मधील कोर्ट डिक्री आधारे वाटून दिलेले आहेत. त्या भूखंडांवर आधी संध्या डागा यांचे व त्यानंतर त्यांनी भूखंड विक्री केलेल्या लोकांची नावे मिळकत पत्रिकेवर नोंदवलेली आहेत.

(२) प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी, जालना यांनी संकीर्ण अर्ज क्र. १७७/२०२३ मध्ये अंकित विरुध्द संध्या व इतर यामध्ये दिनांक २१ एप्रिल, २०२६ रोजी गुन्हा दाखल करून चौकशी करण्याचा आदेश कदीम जालना पोलीस स्टेशन यांना दिला व त्यानुसार त्यामध्ये तत्कालिन उपअधिक्षक, भूमि अभिलेख, जालना आणि तत्कालिन दुय्यम निबंधक यांच्याविरूद्ध गु.र.नं. १७०/२०२६ गुन्हा दाखल करण्यात आला. सदरील गुन्हयाचे अनुषंगाने पोलिस ठाणे कदीम जालना यांच्यामार्फत तपास पुर्ण करून "ब" अंतिम अहवाल मा. न्यायालय यांना सादर करण्यात आला आहे.

(३) जालना येथील सर्व्हे नंबर ५५४ मध्ये असणारे मिळकत पत्रिकेवरील धारक यांनी नोंदणीकृत खरेदी खत क्र. २३१०/२०२२, २३११/२०२२, २३१२/२०२२, २३१३/२०२२ अन्वये भुखंडाची विक्री केल्याने संबंधित खरेदीदार यांनी उपअधिक्षक भूमि अभिलेख जालना कार्यालयात प्लॉटचे नामांतर करणेकामी अर्ज केल्यावरून सदरील भुखंडाचे नामांतर/ फेरफार खरेदीखतांच्या आधारे केले आहे.

(४) संबंधित पी.आर. कार्डची संचिका जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, जालना यांचे कार्यालयात अभिलेख कक्षात उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही. अभिलेखे गहाळ केल्याबाबत श्री. अंकित अभयकुमार आबड व त्यांचे कुटूंबातील इतर सदस्याविरुध्द मा. फौजदारी न्यायालय, जालना यांनी किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ५०१/२०२२ दिनांक १८ जुलै, २०२२ मध्ये दिलेल्या आदेशाप्रमाणे तालुका पोलीस ठाणे, जालना येथे एफआयआर क्र. ०४८५/२०२२ दाखल करण्यात आलेला आहे. तसेच मा. जे.एम.एफ.सी., जिल्हा न्यायालय, जालना यांच्या न्यायालयामध्ये आर.सी.सी.क्र. २०४/२०२५ हा खटला श्री. अंकित आबड व त्यांचे कुटूंबातील इतर सदस्यांविरूध्द प्रलंबित आहे.

(५) हे खरे नाही.

(६) जमीन बनावट कागदपत्रांच्या आधारे हस्तांतरित झालेली नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच, ज्यांनी संचिका गहाळ केली आहे त्यांचे विरूध्द गुन्हा दाखल होऊन फौजदारी खटला प्रलंबित आहे.

-----------------

## राज्यातील राखीव जागेवर प्रवेश घेणाऱ्या बनावट विद्यार्थ्यांची चौकशी करण्याकरिता एसआयटी स्थापन करण्याबाबत

**(१६) * ३८३७७ श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सीईटी सेलच्या मार्फतअनुसूचित जमातीसाठी राखीव जागांवर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांची वैधता तपासणी समितीकडून करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीच्या पडताळणीत विद्यार्थिनींनी बनावट जात प्रमाणपत्राच्या आधारे नागपूर व पुण्यातील पिंपरी चिंचवड येथील कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्याचे तपासणी पथकाने केलेल्या चौकशीत आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास अनुसूचित जमातीसाठी राखीव जागेवर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींनी प्राध्यापकांच्या माध्यमातून दलालांमार्फत बनावट प्रमाणपत्र तयार केले असल्याने पाचगाव (नागपूर) पोलीस ठाण्यात ११ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास राज्यात अनुसूचित जमातीसाठी राखीव जागेवर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांच्या गैरव्यवहारप्रकरणी संबंधित प्राध्यापकांचे व दलालांची सखोल चौकशी करण्याकरिता एसआयटी स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके :** (१) होय

(२) होय

(३) गोविंदराव वंजारी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ऑफ टेक्नॉलॉजी, हुडकेश्वर रोड, नागपूर येथे कार्यरत सहाय्यक प्राध्यापक यांचे मदतीने बनावट वैधता प्रमाणपत्र तयार करुन विद्यार्थ्यांनी सदर कॉलेजमध्ये व रावेत कॉलेज पिंपरी चिंचवड, पुणे येथे प्रवेश घेतल्याचे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्याबाबत दोन प्राध्यापकांसह एकूण ११ जणांविरुध्द पाचगांव पोलीस स्टेशन नागपूर ग्रामीण येथे गुन्हा (FIR) दाखल केला आहे.

(४) या प्रकरणी गुन्ह्याचे पोलीस तपासात एकूण ९ आरोपींना अटक करण्यात आली असून फरार आरोपींचा शोध सुरु आहे. सदर गुन्ह्यामध्ये आरोपी विरुध्द सबळ पुरावे मिळून आल्याने त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळा व एकलव्य आश्रमशाळेमधील परिचारिकांना सेवा-सुविधा देण्याबाबत

**(१७)** * **३२९७४ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळा व एकलव्य निवासी आश्रम शाळांमध्ये कार्यरत परिचारिका (A.N.M.) आरोग्य सेविकांनी कमी मानधन, अपुरी सेवा-सुविधा व वाढता कामाचा ताण यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी (बल्लारपूर) यांनी आदिवासी विकास मंत्री यांना दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी वा त्या दरम्यान मागण्यांचे निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिचारिकांकडून विद्यार्थ्यांची दैनंदिन आरोग्य तपासणी, आजारपणातील उपचार, आपत्कालीन वैद्यकीय सेवा तसेच निवासी आश्रम शाळेत २४ तास आरोग्य देखरेखीची जबाबदारी पार पाडली जात असूनही त्यांना प्रतिमाह केवळ रुपये १३,७०४/- इतके अल्प मानधन दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आश्रम शाळातील परिचारिकांना अत्यल्प मानधनामुळे राहण्याची, भोजनाची, वीज बिलाची तसेच कुटुंबीयांपासून दूर राहून सेवा बजावण्याची आर्थिक व मानसिक अडचण निर्माण होत असून त्यांना कोणत्याही प्रकारच्या शासकीय सुविधा, भत्ते किंवा सामाजिक सुरक्षेचा लाभ उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परिचारिका या २४ तास सेवा बजावत असतानाही त्यांना नियमित साप्ताहिक सुट्टी, शासकीय सुट्ट्या, उन्हाळी सुट्टीतील वेतन तसेच प्रशिक्षण अथवा शासकीय कामासाठी प्रवास खर्चाचा मोबदला मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून परिचारिकांना त्यांच्या सेवाकाळाचा व जबाबदाऱ्यांचा विचार करून दररोज किमान रुपये १,०००/- प्रमाणे वेतन, वार्षिक वेतनवाढ, दिवाळी बोनस, वेतन विवरणपत्र, भविष्यनिर्वाह निधी (P.F.),आरोग्य विमा तसेच इतर शासकीय सेवा-सुविधा उपलब्ध करून देणे तसेच साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी कामावर बोलाविल्यास मोबदला रजा देणे, सुट्टीपूर्वी वेळेत कार्यमुक्त करणे, निवास व वीज देयकाच्या समस्येचे निराकरण करणे तसेच अधिक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणाऱ्या परिचारिकांना स्वतंत्र मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. अशोक वुईके :** (१) होय.

(२) विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याकरिता प्रत्येक आश्रमशाळेत एक याप्रमाणे परिचारिका (A.N.M.)बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त केल्या जातात. किमान वेतनअधिनियम, १९४८ मधील तरतूदीनुसार त्यांना सद्या रु.२०१०५/- इतके मानधन अदा करण्यात येते. त्यामध्ये दर ६ महिन्यांनी वाढ होते.

(३) आश्रमशाळा निवासीअसल्याने परिचारकांच्या निवासाची व्यवस्था आश्रमशाळेत केली जाते.त्यांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी त्यांच्या मानधनामधून भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, बोनस, कामगार कल्याण निधी इत्यादी साठी कपात केली जाते आणि भविष्यात त्यांना त्याचा लाभ दिला जातो.

(४) बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त परिचारिकांना साप्ताहीक सुट्टी/ शासकीय सुट्ट्या देण्यात येतात व या कालावधीचे वेतनही अदा करण्यात येते. प्रशिक्षण कालावधीचे वेतन अदा करण्यात येते.

(५) आश्रमशाळेत परिचारिका (A.N.M.) बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त केल्या जातात. आयुक्त, आदिवासी विकास यांनी दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५, च्या पत्रान्वये त्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत. त्यानुसार

परिचारीकांना अधिक्षक पदाचाअतिरिक्त कार्यभार देणे अपेक्षित नाही. बाह्यस्त्रोतद्वारे नियुक्त कर्मचा-यांना याबाबत केलेल्या करारानुसार देय सेवा-सुविधा दिल्या जातात.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील मौजे धानिवरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथे वऱ्हाडाच्या ट्रकला झालेल्या अपघाताबाबत

**(१८) * ३७७१४ श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील मौजे धानिवरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथे साखरपुड्याला निघालेल्या वऱ्हाडाच्या ट्रकला एका कंटेनरची धडक लागून झालेल्या अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला असून २० ते २५ जण गंभीर जखमी झाल्याचे दिनांक १८ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अपघातात मृत पावलेल्या १३ जणांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रुपये आर्थिक मदत करण्याची घोषणा शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा प्रशासनाने दोन वेळा प्रसिध्दीपत्रक काढत सदर अपघातग्रस्त कुटुंबियांना मदत दिल्याचा दावा केला असून त्यांना अद्यापही आर्थिक मदत मिळाली नसल्याचे दिनांक २५ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मृतांच्या नातेवाईकांची फसवणूक करणाऱ्या अधिका-यांवर कारवाई करण्यासह उक्त कुटुंबियांना त्वरीत मदत देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१), (२), (३) व (४) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ घर मौजे धानिवरी ता. डहाणू, जि. पालघर हद्दीमध्ये दिनांक १८ मे, २०२६ रोजी दुपारी ०४.०० वा. सुमारास कंटेनर व टैम्पो यांच्यामध्ये धडक होऊन झालेल्या अपघातामध्ये सुरुवातीला १३ व्यक्तींचा मृत्यू झाला असून व १७ व्यक्ती जखमी झालेल्या आहेत. सदर जखमी व्यक्तीपैकी कु. कुणाल रविंद्र रावते वय ८ वर्षे रा. बापूगाव ता.डहाणू जि. पालघर याचा वाडीया हॉस्पीटल, मुंबई येथे उपचारादरम्यान दिनांक २३ मे, २०२६ रोजी मृत्यू झाल्याने अपघातातील एकुण मृतांची संख्या १४ झालेली आहे.

सदर प्रकरणात मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधून १४ मयत व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रू.५,००,०००/- प्रमाणे एकुण रू. ७०,००,०००/- मदत अदा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील विविध शेतकरी उत्पादक कंपन्यांना देण्यात आलेल्या अनुदानात झालेली अनियमितता

**(१९) * ३३१०४ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील विविध शेतकरी उत्पादक कंपन्यांना केंद्र व राज्य शासनाच्या योजनांतर्गत वितरित करण्यात आलेल्या सुमारे १९ कोटी रुपयांच्या अनुदान वाटपात तांत्रिक त्रुटी आणि नियमांचे उल्लंघन झाल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात काही बनावट कंपन्या, अस्तित्वात नसलेले प्रकल्प आणि एकाच कुटुंबातील व्यक्तींच्या नावावर असलेल्या संस्थांना नियमबाह्य पद्धतीने लाभ मिळवून देण्यात आला असून तत्कालीन जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्या अहवालातही यावर आक्षेप घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कृषी आयुक्त आणि नाशिक विभागीय आयुक्तांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश देऊनही जिल्हा स्तरावरील संबंधित यंत्रणेने अद्याप या प्रकरणाची अंतिम चौकशी अहवाल सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून जिल्ह्यातील विविध शेतकरी उत्पादक कंपन्यांना केंद्र व राज्य शासनाच्या योजनांतर्गत वितरित करण्यात आलेल्या अनुदान वाटपात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व संस्थांवर कारवाई करण्यासह अनुदान गैरव्यवहारामुळे जिल्ह्यातील गरजू आणि पात्र शेतकरी कंपन्याना अनुदान देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१), (२), (३) व (४) जिल्हा विकास आराखडा अंतर्गत कृषी विभागामार्फत सन २०२५-२६ मध्ये एकूण २१ शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रकल्प मंजूर करताना झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने दक्षता पथक,कृषि आयुक्तालय यांचा ४ सप्टेंबर, २०२५ चा अहवाल, जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचे दिनांक ६ एप्रिल, २०२६ चे पत्र व कृषि आयुक्तालयाची शिफारस विचारात घेता, शासन आदेश क्रमांक कृअनि-१३२६/ प्र.क्र.७७/ ई-१६२७१३४/ ५-अे, दिनांक २६ मे,२०२६ अन्वये तत्कालीन प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नंदुरबार श्री.चेतन कुमार ठाकरे यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ नुसार पुढील शिस्तंभंगविषयक कार्यवाही कार्यान्वित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दहेगाव पाटोदा (ता. येवला जि. नाशिक ) वनपरिक्षेत्र कार्यालयातील वनपाल व वनरक्षक यांनी लाच मागितल्याबाबत

**(२०) * ३९७१३ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहेगाव पाटोदा (ता.येवला जि.नाशिक) वनपरिक्षेत्र येवला येथील शेत गट ६१ मधील २ हेक्टर ४९ आर क्षेत्रातील सागाचे वृक्ष तोडून विक्रीस परवानगी देण्यासाठी वनपाल, वनरक्षक व इतर कर्मचा-यांनी लाच मागितल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वन विभागात विविध कामांसाठी लाच मागीतली जात असून साग, खैर लाकडांची तोड करुन अपहार केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दहेगाव पाटोदा (ता.येवला जि.नाशिक) वनपरिक्षेत्र येवला येथील संबंधित दोषी वनपाल, वनरक्षक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गणेश नाईक :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
वन विभागात विविध कामांसाठी साग, खैर लाकडांची तोड करुन कुठल्याही प्रकारचा अपहार होत नाही.

(३) सदर प्रकरणी श्री. भाऊसाहेब माळी, वनपाल, राजापूर वनक्षेत्र येवला व इतर कर्मचारी यांचेविरुध्द पोलीस स्टेशन येवला, जि.नाशिक येथे गु.र.क्र.१५९ /२०२६अन्वये भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७, ७ अ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यातील लाभार्थ्यांना मनरेगातंर्गत कार्यसंकेतांक उपलब्ध करून अनुदान अदा करण्याबाबत

**(२१) * ४०५९६ श्री.सुमित वानखेडे (आर्वी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत (ग्रामीण) घरकुलाचे काम पूर्ण केलेल्या अनेक लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत मजुरीच्या अनुदानासाठी कार्यसंकेतांक (Work Code) उपलब्ध नसल्यामुळे अनुदान मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यसंकेतांक उपलब्ध नसल्यामुळे लाभार्थी गत दोन वर्षांपासून अनुदानापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत (ग्रामीण) घरकुलाचे काम पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत कार्यसंकेतांक उपलब्ध करून प्रलंबित अनुदान अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे खरे आहे.

वर्धा जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत आर्वी तालुक्यातील ५०, आष्टी तालुक्यातील ९ असे एकुण ५९ घरकुलांचे कार्यसंकेतांक (Work Code) जनरेट झालेले नसल्यामुळे त्यांना मनरेगा अंतर्गत मिळणाऱ्या मजुरीचा लाभ अदा करण्यात आलेला नाही. तसेच कारंजा तालुक्यातील सर्व कार्यसंकेतांक (Work Code) जनरेट झालेले असल्यामुळे त्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

वर्धा जिल्ह्यातील आर्वी, आष्टी, कारंजा (घा) तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मनरेगाचा लाभ देण्यासाठी एकुण ५५५ घरकुलांचे कार्यसंकेतांक (Work Code) जनरेट न झाल्याची माहिती गट विकास अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली होती. तथापि राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर मुंबई यांचेकडे सदर माहिती सादर करण्यात आली असता ५५५ घरकुलांपैकी ४९६ घरकुलांच्या लाभार्थ्यांचे कार्यसंकेतांक (Work Code) जनरेट झालेले असुन त्यांना मनरेगा अंतर्गत लाभ देण्यात आलेला आहे. तसेच उर्वरित ५९ घरकुलांचे कार्यसंकेतांक (Work Code) जनरेट झालेले नसल्यामुळे त्यांना मनरेगा अंतर्गत मिळणाऱ्या मजुरीचा लाभ यापूर्वी अदा करण्यात आलेला नाही. सद्यस्थितीत याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या निर्बंधांमुळे स्थानिक आदिवासींना रोजगार मिळत नसल्याबाबत

**(२२) * ३३३४१ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील नागझिरा व्याघ्र प्रकल्प घोषित होण्यापूर्वी परिसरातील स्थानिक आदिवासी नागरिकांना मोहफुले संकलन, तेंदूपत्ता तोडणी तसेच वनविभागाच्या विविध कामांमधून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३ नंतर नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील मोठा भाग कोअर झोनमध्ये समाविष्ट करण्यात आल्याने जंगलातील कामांवर निर्बंध आले असून सुमारे १० हजार कुटुंबांपैकी ९ हजार आदिवासी कुटुंबांचा रोजगार हिरावला गेल्याने त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोजगाराच्या संधी कमी झाल्यामुळे कोअर झोनलगतच्या गावांतील अनेक स्थानिकांना शहरांकडे स्थलांतर करावे लागत असून काही ठिकाणी स्थानिक मजुरांकडून कमी मजुरीत काम करून घेतले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागझिरा व्याघ्र प्रकल्प परिसरात वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून तिरोडा, साकोली आणि उमरझरी परिसरात वाघ व बिबट्यांच्या हल्ल्यांत नागरिकांचा मृत्यू व जखमी होण्याच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून स्थानिक आदिवासी नागरिकांना पर्यायी रोजगार, वनाधिकार लाभ, योग्य मजुरी तसेच मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प सन २०१३ मध्ये जाहीर झाला असला तरी नवेगाव-नागझिरा क्षेत्र सन १९५५ पासून संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित आहे. सदर क्षेत्रात तेंदुपत्ता व अकाष्ठ वनोपज गोळा करण्यास पुर्वीपासूनच बंधने होती. मात्र अभयारण्याच्या बाहेर तेंदूपत्ता व अकाष्ठ वनोपज गोळा करण्यासंदर्भातील उपलब्ध असलेला रोजगार व संबंधित कामे आजही सुरू आहेत. बफर क्षेत्रात सदर कामांवर कोणतेही प्रतिबंध लावण्यात आलेले नाहीत. व्याघ्र प्रकल्पाबाहेरील बफर क्षेत्रात आदिवासी नागरिकांना मोहफुले संकलन, तेंदुपत्ता तोडणी तसेच वनविभागाच्या विविध कामांमधून रोजगार उपलब्ध होत आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प व प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांचे संयुक्त विद्यमानाने नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रालगत परिसर अंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूर येथे १० वी पास किंवा त्यापुढील वय वर्षे १८ ते ३० यामधील युवक-युवती करीता विविध रोजगार पुरक कोर्सेसचे निशुल्क ४५ दिवसांचे निवासी प्रशिक्षण दिले जाते. त्याचबरोबर प्रशिक्षणानंतर नोकरीची संधी सुध्दा उपलब्ध करून दिली जाते. सदरचे प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन (Stipend) देण्यात येते. यामुळे त्यांना आपले स्वग्राम न सोडता स्थानिक ठिकाणी राहून स्वयंरोजगार निर्मिती करणे शक्य होते.

तसेच स्थानिक मजुरांना वनविभागाद्वारे कामगार आयुक्त, महाराष्ट्र यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत नमुद तरतुदीनुसार ठराविक दराप्रमाणे मजुरी नियमीत अदा करण्यात येते.

(४) अलिकडच्या काळात उमरझरी परिसरात वाघांच्या हल्ल्यांची घटना घडली आहे. ही बाब खरी आहे. या घटनांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या पिडीतांच्या वारसांना किंवा जखमी पिडीतांना महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ अन्वये अनुज्ञेय असलेली आर्थिक मदत प्रदान करण्यात येते. दरम्यानच्या काळात दिनांक २८ जून,२०२६ रोजी अशाप्रकारे वारंवार हल्ला करणारी टी-२७ ह्या वाघिणीला जेरबंद/पिंजराबंद करण्यात आले आहे.

(५) स्थानिक आदिवासी नागरिकांना पर्यायी रोजगार, वनाधिकार लाभ व योग्य मजुरीकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

• वनविभागाद्वारे अखाद्य वनस्पती निर्मुलनाची कामे, पर्यटन रस्ते दुरुस्ती, शासकीय इमारत दुरुस्ती, वनवणवा हंगाम, वनसंरक्षक कामी असे एकूण २६२ च्या संख्येत मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच पर्यटन गेट जिप्सी चालक मालक तथा मार्गदर्शक म्हणून रोजगार उपलब्ध करून देण्यात येत असून, पर्यटन गेटजवळ सुध्दा स्थानिक नागरिकांना विविध रोजगार उपलब्ध होत आहे.

• नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प व प्रथम एज्युकेशन फाउंडेशन कौशल्य संस्था यांचे संयुक्त विद्यमानाने नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रालगत ग्रामपरिसर अंतर्गत सुशिक्षित बेरोजगार मुला-मुलींना रोजगाराबाबत कौशल्यपुर्ण प्रशिक्षण देण्यात येत असून, प्रशिक्षण कालावधीचे विद्यावेतन (Stipend) देण्यात येते.

मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत:

• वन्यप्राण्यांच्या हल्ल्याची घटना झाल्यास, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११(१) (क) अन्वये राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी ठरवून दिलेल्या प्रमाणभुत कार्यपध्दतीनुसार उक्त प्राण्यास जेरबंद करण्याच्या प्रस्तावाला प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून नियमानुसार मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येते.

• भविष्यात अशाप्रकारे मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्याकरीता वनविभागामार्फत विविध उपाय हाती घेण्यात आले आहेत. उदा. उन्हाळ्यात वन्यप्राणी पिण्याच्या पाण्याच्या शोधात मानवी अधिवास क्षेत्रात येऊ नये, याकरीता जंगलातच नैसर्गिक पानवठ्यांसह कृत्रिम पानवठे, सिमेंट व गॅबीयन बंधारे तयार करण्यात येत आहेत.

• जंगलामध्ये वन्यप्राण्यांना मुबलक अन्न उपलब्ध व्हावे, याकरीता कुरण विकासाची व रोपवन विषयक कामे करण्यात येत आहेत.

• संयुक्त वनव्यवस्थापन समिती, स्वयंसेवी संस्था तसेच पर्यावरण व वन्यजीव संरक्षणासाठी काम करणाऱ्या व्यक्तींची व स्थानिक नागरिकांची वेळोवेळी मदत घेण्यात येते.

• तसेच प्राथमिक प्रतिसाद दल (पीआरटी) व जलद बचाव पथक (आरआरटी) यांचेमार्फत वन्य प्राण्यांचा मागोवा घेण्यात येतो व वन्यप्राणी मानवी वस्तीलगत येत असल्यास याबाबतची आगाऊ सूचना गावकऱ्यांना दिली जात आहे. त्याचप्रमाणे दवंडी, सभा इ. मार्फत गावकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या बनावट संकेतस्थळाद्वारे पदभरतीमध्ये बेरोजगारांची फसवणूक झाल्याबाबत

**(२३) * ३९४१७ श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कृषी विद्यापीठे व त्यांच्या संलग्न संस्थांमार्फत भरती प्रक्रिया अधिकृत संकेतस्थळ व शासनमान्य जाहिरातीद्वारेच केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या नावाशी साधर्म्य असलेले "महात्मा फुले विकास केंद्र" नावाने बनावट संकेतस्थळ तयार करून मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील प्रत्येक गावात एक "कृषिमित्र" या नावाने सुमारे ३० हजार ५०० पदांची भरती असल्याची खोटी जाहिरात छत्रपती संभाजीनगर येथील एका वर्तमानपत्रात दिनांक १ एप्रिल, २०२६ रोजी प्रसिद्ध करून राज्यातील बेरोजगारांकडून प्रत्येकी २५० रुपये घेतले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भरतीशी राहुरी कृषी विद्यापीठाचा कोणताही संबंध नसून "कृषिमित्र" नावाचे कोणतेही पद शासनाच्या आकृतीबंधात अस्तित्वात नसल्याचे राहुरी कृषी विद्यापीठाने स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधीत दोषीवर कारवाई करण्यासह अशा बनावट पद भरती जाहिराती व संकेतस्थळाद्वारे होणाऱ्या फसवणुकीस प्रतिबंध करण्यासाठी तसेच सुशिक्षित बेरोजगारांचे संरक्षण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) शासन पत्र दिनांक ११ जून, २०२६ च्या अनुषंगाने बोगस जाहिरातीच्या बाबत सखोल चौकशी करुन एफआयआर/ फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत कृषी आयुक्तालयास्तरावरुन दिनांक ११ जून, २०२६ रोजी सर्व क्षेत्रिय कार्यालयांना पत्र निर्गमित करण्यात आलेले आहे. तसेच सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व उपविभागीय कृषी अधिकारी यांना स्थानिक वृत्तपत्रे व माध्यमांद्वारे "कृषी विभागात अथवा कृषी विद्यापीठांमध्ये "कृषिमित्र" नावाचे कोणतेही अधिकृत पद अस्तित्वात नाही" असे जाहीर प्रकटन प्रसिद्ध करून व्यापक जनजागृती करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच, सर्व संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनाही त्यांच्या कार्यक्षेत्रात अशा फसव्या प्रकारांना आळा घालण्यासाठी जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच दिनांक १४ जून, २०२६ रोजी कृषी आयुक्तालयाकडून सकाळ ॲग्रोवन या वृत्तपत्रात बोगस जाहिरातीच्या अनुषंगाने खंडण करण्यात आले असून तरुणांनी अशा बनावट/बोगस जाहिराती व संकेतस्थळांना प्रतिसाद देऊ नये असे आवाहन कृषी आयुक्तालयाकडून करण्यात आले आहे.सदर प्रकरणी अलंकार पोलीस स्टेशन,पुणे येथे गुन्हा रं.न.०१२५ /२०२६ दिनांक १२ जून,२०२६ रोजी दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कृषी निविष्ठा व यंत्रसामुग्री वाटपात केलेला गैरव्यवहार

**(२४) * ३३०९४ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: नागपूर कृषी विभागातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांच्या नावावर कृषी निविष्ठा, सूक्ष्म सिंचन साहित्य तसेच कृषी यंत्रसामुग्री विक्री केंद्रे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय कृषी विकास योजनेतंर्गत 'प्रति थेंब अधिक पीक'या सूक्ष्म सिंचन योजनेत काही अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून शेतकऱ्यांना विशिष्ट केंद्रांतूनच साहित्य खरेदी करण्यासाठी दबाव टाकल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर फलोत्पादन विभागाने दिनांक ८ एप्रिल, २०२६ रोजी वा त्या दरम्यान प्रतिबंधात्मक परिपत्रक निर्गमित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फलोत्पादन विभागाने अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी कारवाईचे निर्देश दिले असताना कृषी यांत्रिकीकरण विभागातही अशाच प्रकारच्या तक्रारी प्राप्त असूनही अद्याप कोणतेही प्रतिबंधात्मक परिपत्रक निर्गमित करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषी विभागातील अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या किंवा कुटुंबीयांच्या नावाने कृषी व्यवसाय चालवून त्याच विभागाच्या योजनांमधून अप्रत्यक्ष लाभ मिळविणे हे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांचे उल्लंघन ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत काही अधिकारी शेतकऱ्यांना विशिष्ट विक्री केंद्रांतूनच कृषी अवजारे व यंत्रसामुग्री खरेदी करण्यास भाग पाडत असल्याची तक्रार शासनाकडे प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करणे, कृषी विभागाच्या सर्व योजनांसाठी हितसंबंधांचा संघर्ष टाळण्यासाठी एकसमान धोरण लागू करणे, कृषी यांत्रिकीकरण विभागासाठी स्वतंत्र प्रतिबंधात्मक परिपत्रक निर्गमित करणे तसेच शेतकऱ्यांना पारदर्शक व स्वायत्त निवडीचा अधिकार सुनिश्चित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे आहे.

नागपूर विभागातील नागपूर, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यात कृषि अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांच्या नावावर कृषि सेवा केंद्र, सूक्ष्म सिंचन साहित्य व कृषि यांत्रिकीकरण विक्री केंद्र सुरू असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) हे खरे आहे. संचालक, फलोत्पादन यांनी सर्व सूक्ष्म सिंचन संच नोंदणीकृत उत्पादक कंपन्या यांना दिनांक ८ एप्रिल, २०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना जारी केल्या आहेत.

(३) संचालक (कृषि अभियांत्रिकी संचालनालय), कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या दिनांक २३ जुन, २०२६ च्या पत्रान्वये सर्व विभागीय कृषि सहसंचालक व सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना क्षेत्रिय स्तरावर पडताळणी करण्यासाठी आदेशीत करण्यात आलेले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) याबाबत दिनांक १८ मे, २०२६ रोजीच्या पत्रान्वये कृषि आयुक्तालयास तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, भंडारा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ मे,२०२६ च्या पत्रान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना दिनांक ३ जून, २०२६ अन्वये सादर केला आहे. त्यामध्ये उप विभागीय कृषि अधिकारी, भंडारा यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चा भंग केल्याचा अहवाल सादर केला आहे. तद्नुषंगाने विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी दिनांक २३ जून,२०२६ च्या पत्रान्वये उप विभागीय कृषि अधिकारी, भंडारा यांच्या विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ अन्वये कार्यवाहीचा प्रस्ताव आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना सादर केला आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.